# पश्चिम भारतातील वन्यजीव स्थळं

अतुल धामनकर

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**पश्चिम भारतातील वन्यजीव स्थळं**
अतुल धामनकर

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
अतुल धामनकर
पटेल हायस्कूलसमोर,
शिवाजी चौक, चंद्रपूर - ४४२४०२
मो. न. : ७६२०७९२२०६, ९४२३६१९९३३
E mail : atultiger@rediffmail.com.

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २७०/-

# लेखकाचे मनोगत

भारत हा नैसर्गिक साधनसंपत्तीने अतिशय संपन्न असलेला देश आहे. इथे कोणत्याही भागात गेलं तरी तुम्हाला संस्कृतीच्या विविधतेसोबत जैवविविधतेचाही आनंद घेता येतो. अगदी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि गुजरातच्या पश्चिमी टोकापासून अरुणाचल प्रदेशच्या पूर्व टोकापर्यंत भारतातील वन व वन्यजीवांमध्ये कमालीचं वैविध्य आहे. या वन्य जीवनाबद्दल अभ्यासपूर्ण लेखन मागील काही वर्षांत बरंच झालंय. त्यांच्यासोबतच आज विविध दूरदर्शन वाहिन्यांवरूनदेखील वन्यजीवांच्या अंतरंगात डोकावणारे अभ्यासपूर्ण अनेक कार्यक्रम अव्याहतपणे सुरू असतात. साहजिकच आज सामान्य लोकांमध्येदेखील वन व वन्यजीवांविषयी फार उत्सुकता जागृत झाली आहे. त्याच उत्सुकतेतून ते भारतातील अनेक व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय उद्यानं आणि वन्यजीव अभयारण्यांना भेटी देऊन तिथे नैसर्गिक अवस्थेतील वन्य जीवन न्याहाळण्याचे आणि त्याला कॅमेराबद्ध करण्याचे ठरवतात.

पण असं असलं तरी वन्यजीव निरीक्षणाला सहज कुठल्याही पर्यटनासाठी बाहेर पडावं, तसं जाऊन चालत नाही. वन्यजीव क्षेत्रे नेहमीच दूरवर वसलेली असतात. बहुधा त्यांच्या आसपास मोठी शहरं-गावंही नसतात. त्यामुळे इथे जाण्यासाठी बरीच पूर्वतयारी करणं आवश्यकच ठरतं.

अशा जंगल भेटीसाठी बाहेर पडण्यापूर्वीच त्याची नीट माहिती करून आखणी करणं अतिशय गरजेचं असतं. त्यामुळे सगळ्यात आधी त्या अरण्याची इत्थंभूत माहिती मिळवणं, कुठून कसं जायचं हे ठरवणं, विमान, रेल्वे, बस, खासगी टॅक्सीची तिकिटं किंवा अग्रीम आरक्षण करणं, प्रवेशपत्र प्राप्त करणं, हॉटेल किंवा वनविश्रामगृहाचं आरक्षण करणं, त्या जागी कोणकोणते वन्य प्राणी-पक्षी आढळतात त्याची आधीच माहिती करून त्यांच्या निरीक्षण किंवा प्रकाशचित्रणासाठी काय-काय करावं लागेल, कोणती फोटोग्राफी उपकरणं सोबत घ्यावी लागणार याची आखणी करणं, हे मोठंच काम असतं. अशा वेळी अगदी छोट्याशा माहितीअभावी देखील तुमची भटकंती गोत्यात येऊ शकते. कित्येक वेळा एखाद्या बाबीची माहिती नसल्याने प्रत्यक्ष त्या अरण्यात गेल्यावर जंगलफेरी न मिळणे, हॉटेल न मिळणे, वाहतुकीच्या साधनांची कमतरता यासारख्या बाबी तुमचा भ्रमंतीचा आनंदच हिरावून घेऊ शकतात.

आज बऱ्याच वन्यजीव क्षेत्रांत अनेक टूर ऑपरेटर्स भ्रमंती आयोजित करून देतात; पण इथे जाताना या टूर ऑपरेटर्सना फक्त हॉटेल-टॅक्सी बुकिंगशिवाय इतर कुठल्या बाबतींची माहिती आहे की नाही, हे आपल्याला माहीत नसतं. खासकरून वन्यजीव, त्यांचा आढळ, त्यांची स्थळं, वन्यजीव निरीक्षण व फोटोग्राफीच्या संधी या बाबी अशा टूर ऑपरेटर्सना माहिती आहेत काय, हे आधीच तपासून घ्यावं. कारण एखाद्या ऐतिहासिक किंवा धार्मिक स्थळाला भेट देण्यासारखं वन्यजीव पर्यटन नक्कीच नसतं. त्यात शेवटी तुम्हाला प्रवास, राहणं-खाणं या बाबींसोबतच उत्तम वन्यजीव निरीक्षणाच्या संधी मिळणंही तेवढंच महत्त्वाचं असतं. असं न झाल्यास तुमच्या अरण्यभेटीचा आनंदच कमी होऊन हिरमोड होऊ शकतो.

निसर्गात जाताना मनात उत्साह असला तरी काही अवास्तव कल्पना घेऊन मुळीच जाऊ नये. उदा. मी ताडोबाला जातोय ते वाघच बघायला चाललोय, असे बरेच जण सांगतात; पण असं करताना त्यांना वाघ हा जंगलातील अत्यंत लपून-छपून वावरणारा, धूर्त शिकारी प्राणी आहे, या गोष्टीचं भान नसतं. निसर्गाने त्याला जंगलातील कुठल्याही अधिवासात बेमालूमपणे मिसळून जाण्याची अद्वितीय अशी देणगी दिली आहे. त्यामुळेच तो अतिशय चौकस, तीक्ष्ण नाक, कान, डोळे असणाऱ्या चितळ, सांबर, रानगवे यांची शिकार करू शकतो. साहजिकच तो या जनावरांच्या तुलनेत कितीतरी कमी इंद्रियसंवेदना असलेल्या माणसापासून सहजपणे लपू शकतो. त्यामुळे वाघ बघण्याचा प्रयत्न करणं हा वन्यजीव पर्यटनातला एक भाग झाला; पण वाघच दिसला पाहिजे हा अट्टाहास चुकीचाच ठरतो. त्याशिवायदेखील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात आणखी ४५ प्रजातींचे सस्तन प्राणी आणि २८२ पेक्षा जास्त प्रकारचे रंगीबेरंगी पक्षीपण आहेत, हे लक्षात ठेवावं. म्हणजे तुम्ही जंगलात फिरताना तुम्हाला लगेचच वाघ दिसेल असं होणार नाही; पण बरेच पक्षी, प्राणी हे नक्कीच दिसतील. त्यामुळे त्यांच्याकडे डोळसपणे बघणं, त्यांचं निरीक्षण करणं हा आनंद तुम्ही भरपूर प्रमाणात घेऊ शकता. पुढे जेव्हा तुम्हाला कधीही वाघ दिसेल तेव्हा तो आनंद द्विगुणित होईल, याची खात्री बाळगा.

आजकाल निसर्ग पर्यटनाला निघताना अनेकजण कुटुंबासह मित्रफोटोग्राफर्सचा ग्रुप किंवा लहान-मोठ्या गटाने जातात. त्यावेळी प्रत्येकाचा निसर्गाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा असतो; पण निसर्ग, वन्य जीवन हे आपल्या ताब्यात नाही, तसेच त्यांना कुठल्याही वेळेचे बंधनसुद्धा नसते, हे नीट ध्यानात ठेवावं. त्यामुळे एखाद्या स्थळाला भेट देण्यासारखं न जाता या पर्यटनासाठी जास्तीचा वेळ ठेवावा. बरेचजण अशा जागी जातानादेखील धावती भेट देतात. जेव्हा कुणी मला गर्वाने सांगतात, की हो आम्हीसुद्धा भरतपूरला जाऊन आलोय आणि तिथे चांगलं दीड तास होतो, तेव्हा या वाक्यावर हसावं की रडावं, हेच कळत नाही.

जयपूरहून आग्ऱ्याला जाताना हे भोज्याला शिवल्यासारखं वाटेतल्या भरतपूरला फक्त हात लावून येतात. खरं तर युनेस्कोची 'वर्ल्ड हॅरिटेज साईट' असलेलं भरतपूर जगातलं एक उत्कृष्ट पक्षी अभयारण्य आहे. इथे कमीत कमी ३-४ दिवस घालवले नाही, तर तुम्ही त्याचं नीट निरीक्षणसुद्धा करू शकणार नाही. त्यामुळेच कुठेही निसर्ग पर्यटनाला जाताना चार दिवसांत तीन अभयारण्ये किंवा सहा दिवसांत चार-पाच जंगलांना भेटी देण्याचे प्रोग्राम मुळीच आखू नयेत. त्यामुळे तुम्हाला कोणत्याही जंगल व त्यातील वन्यजीवांचे नीट अवलोकन करायची संधी मिळणार नाही. साहजिकच तुमचे वन्यजीव निरीक्षणाबद्दलचे मत कलुषित होण्याची शक्यता असते. आम्ही चांगले एक दिवस ताडोबात होतो आणि तरीही आम्हाला वाघ दिसला नाही, असे म्हणणाऱ्यांना मी नेहमी सांगतो की, इथे तुम्ही तीन-चार दिवस राहून कमीत कमी चार ते सहा जंगल सफारी केल्या तरच तुम्हाला नीट वन्यजीव निरीक्षण करायची संधी मिळू शकेल.

कुठलाही वन्य प्राणी खात्रीशीर दिसणं ही बाब गृहीत धरणं हेच चुकीचं आहे. 'वन्य' या शब्दातच ते ध्वनित होतं. वन्य जीवन हे ठरवून बघता येत नाही, यातच त्याची गोडी आणि आनंद टिकून असतो. त्यामुळे पुढे काय घडणार, काय दिसणार, ही हुरहूर तुम्हाला परत-परत त्याच जंगलाकडे आकृष्ट करते. त्यामुळे बरेच निसर्गप्रेमी सतत, एकाच जंगलाच्या वर्षानुवर्षे वाऱ्या करूनदेखील कंटाळत नाहीत.

मी या पुस्तकात जंगल व वन्यजीव पर्यटनासाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक गोष्टींचा अंतर्भाव करायचा प्रयत्न केला आहे. मी मागील २३ वर्षे भारतातील विविध अरण्यांतून वन्यजीवांचं निरीक्षण, अभ्यास आणि प्रकाशचित्रणासाठी भटकंती करतोय. त्यातूनच आलेल्या अनुभवांवर हे पुस्तक आधारित आहे. त्यामुळे याचा निसर्गप्रेमी भटक्यांना भरपूर उपयोग होईल, अशी अपेक्षा आहे. त्याशिवाय कुणाला आणखी काही माहिती हवी असल्यास त्यांनी खालील मोबाईल नंबर किंवा ई-मेलवर माझ्याशी संपर्क साधावा.

भारतातील पश्चिम, पूर्व, दक्षिण, उत्तर आणि मध्य या पाच भागांवरील मालिकेतील 'पश्चिम भारतातील वन्यजीव स्थळं' हे पुस्तक तुमच्या हातात देताना खूप आनंद होतोय. यासाठी मी माझे प्रकाशक व इतर प्रत्येकजण ज्यांचा हातभार या पुस्तकाच्या निर्मितीसाठी लागलाय, त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

धन्यवाद!

आपला,
अतुल धामनकर



# अनुक्रमणिका


१) रणथंबोर व्याघ्र प्रकल्प ........................................... ११
२) सरिस्का व्याघ्र प्रकल्प ........................................... १७
३) मुकुंदरा हिल्स व्याघ्र प्रकल्प ....................................... २२
४) सह्याद्री व्याघ्र प्रकल्प ........................................... २६
५) महादेई व्याघ्र प्रकल्प ........................................... ३०
६) वंसदा राष्ट्रीय उद्यान ........................................... ३४
७) वेलावदार राष्ट्रीय उद्यान ........................................... ३८
८) गीर राष्ट्रीय उद्यान ........................................... ४२
९) नरारा मरीन राष्ट्रीय उद्यान ........................................... ४७
१०) केवलादेव घाना राष्ट्रीय उद्यान ....................................... ५१
११) मोलेम राष्ट्रीय उद्यान ........................................... ५६
१२) माऊंट अबू राष्ट्रीय उद्यान ........................................... ६०
१३) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान ........................................... ६३
१४) दर्राह राष्ट्रीय उद्यान ........................................... ६६
१५) डेझर्ट राष्ट्रीय उद्यान ........................................... ६९
१६) भगवान महावीर राष्ट्रीय उद्यान ....................................... ७२
१७) बोंडला वन्यजीव अभयारण्य ........................................... ७५
१८) डॉ. सलीम अली पक्षी अभयारण्य ....................................... ७८
१९) शूलपणेश्वर वन्यजीव अभयारण्य ....................................... ८०
२०) बलराम-अंबाजी वन्यजीव अभयारण्य ....................................... ८३
२१) कच्छ डेझर्ट वन्यजीव अभयारण्य ....................................... ८६
२२) लिटिल रण रानगाढव अभयारण्य ....................................... ८९
२३) नारायण सरोवर वन्यजीव अभयारण्य ....................................... ९२
२४) बारदा वन्यजीव अभयारण्य ........................................... ९५
२५) जेस्सोर अस्वल अभयारण्य ........................................... ९८

२६) पूर्णा वन्यजीव अभयारण्य ........................................ १०१
२७) जांबूघोडा वन्यजीव अभयारण्य .................................. १०४
२८) नलसरोवर अभयारण्य ............................................ १०७
२९) रतनमहल अस्वल अभयारण्य ...................................... ११०
३०) पाणीया वन्यजीव अभयारण्य ..................................... ११३
३१) रामपारा वन्यजीव अभयारण्य ..................................... ११६
३२) खिजाडिया पक्षी अभयारण्य ...................................... ११९
३३) थोल पक्षी अभयारण्य ............................................ १२२
३४) कळसूबाई-हरिश्चंद्रगड अभयारण्य ................................ १२५
३५) जायकवाडी पक्षी अभयारण्य ...................................... १२८
३६) नान्नज माळढोक अभयारण्य ..................................... १३१
३७) गौताळा – औतरामगड अभयारण्य ............................... १३४
३८) यावल वन्यजीव अभयारण्य ...................................... १३७
३९) भीमाशंकर वन्यजीव अभयारण्य .................................. १४०
४०) नांदूर मध्यमेश्वर पक्षी अभयारण्य ................................ १४३
४१) अनेरडॅम वन्यजीव अभयारण्य .................................... १४६
४२) कर्नाळा पक्षी अभयारण्य .......................................... १४९
४३) फणसाड वन्यजीव अभयारण्य ..................................... १५२
४४) तानसा वन्यजीव अभयारण्य ...................................... १५५
४५) मालवण मरीन अभयारण्य ........................................ १५८
४६) सागरेश्वर वन्यजीव अभयारण्य .................................. १६१
४७) येडशी रामलिंग अभयारण्य ....................................... १६४
४८) बस्सी वन्यजीव अभयारण्य ....................................... १६७
४९) भैंसरोडगड वन्यजीव अभयारण्य .................................. १७०
५०) नॅशनल चंबल अभयारण्य ......................................... १७३
५१) जयसमंद वन्यजीव अभयारण्य .................................... १७६
५२) जवाहर सागर वन्यजीव अभयारण्य ................................ १७९
५३) केलादेवी वन्यजीव अभयारण्य .................................... १८२
५४) कुंभलगड वन्यजीव अभयारण्य .................................... १८५
५५) नाहरगड वन्यजीव अभयारण्य ..................................... १८८

५६) फुलवारी वन्यजीव अभयारण्य .................................... १९१
५७) जामवा रामगढ अभयारण्य ........................................ १९४
५८) रामगढ विषधारी अभयारण्य ...................................... १९७
५९) सवाई मानसिंग अभयारण्य........................................ २००
६०) शेरगढ वन्यजीव अभयारण्य ...................................... २०२
६१) सीतामाता अभयारण्य ............................................ २०५
६२) ताल छापर वन्यजीव अभयारण्य ................................. २०८
६३) तोडगढ रावली अभयारण्य ....................................... २११
६४) वनविहार-रामसागर अभयारण्य .................................... २१४
६५) जंगलात जाताना... .............................................. २१७

✦✦✦








भर दुपारचा हॉटेलमध्ये आलेल्या कँटरमध्ये बसून मी बाहेर पडलो. एप्रिल महिना असल्याने राजस्थानची उष्णता अंगाला चांगलेच चटके देत होती. गरम वाऱ्याच्या उष्ण झळा श्वासासोबत आतवर जाऊन घसा वारंवार कोरडा पाडत होत्या. लवकरच रणथंबोरच्या मुख्य प्रवेशद्वारावर पोहोचलो आणि समोरच अरवली पर्वतरांगांमध्ये वसलेलं रणथंबोरचं सुप्रसिद्ध जंगल दिसू लागलं. उष्णकाळ सुरू असल्याने या जंगलाची पार रयाच गेली होती. फक्त काही जागी डोंगरउतारावर फुललेल्या पळसाच्या रक्तीम लालिमेचा डोळ्यांना दिलासा वाटला. बाकी सगळे जंगल पानगळीचा शाप भोगत करडं पडलं होतं.

सगळे सोपस्कार पार पडले आणि आमचे कँटर प्रवेशद्वारातून आत शिरून वेगाने धावू लागले. डावीकडे एक मोठा नाला होता. त्याच्या काठावर झाडांच्या सावलीत दोन मगरी आरामात पसरल्या होत्या. एवढ्या दुपारी मगरींना 'बास्किंग' करताना पाहून मला जरा आश्चर्यच वाटलं.

आमचा तीन नंबरचा रूट होता. मुख्य द्वारालगतच्या वडाच्या झाडावर बरीच वानरं पळापळीचा खेळ खेळत होती. काही वानरं उष्णतेने त्रासून डोळे मिटून पेंगत होती. आयांनी आपापली पोरं पोटाशी नीट धरून ठेवली होती; पण तरीही एखादं वात्रट पोरगं हळूच जाऊन दुसऱ्याची शेपूट खेचून यायचं. उजवीकडे उंचच उंच कड्यावर गेलेला रणथंबोरचा प्रचंड किल्ला दिसला. पायथ्याशी एका चौथऱ्यावर बऱ्याच जागी दाणे, चणे-फुटाणे टाकले होते. तिथे टकाचोर, पोपट, पीतकंठी चिमण्या आणि वानरांची एकच झुंबड उडाली होती.

रणथंबोरचा किल्ला राजा हमीरने बांधला होता. या किल्ल्यावर एक गणेश मंदिर असून तिथे भक्तांची बरीच गर्दी दर्शनासाठी जमते; पण या गर्दीमुळे या व्याघ्र प्रकल्पाला बराच त्रास सहन करावा लागतो. वन्यजीव-पाखरांना खाणं टाकणं, प्लास्टिक कचरा इतस्तत: टाकणं, दिवसरात्र लोकांची वर्दळ याचा जाच इथल्या वाघ व वन्यजीवांसाठी रोजचाच झाला आहे.

कँटर आत शिरताच मला डावीकडे, रस्त्यालगतच निळ्याशार पाण्याने भरलेले तलाव दिसले. या रखरखीत, करपल्यासारख्या दिसणाऱ्या अरण्यात हा डोळ्यांना सुखावणारा देखावा होता. हा आहे 'पद्म तलाव.' यात जागोजागी कमळं फुलतात म्हणून याला हे नाव पडलं आहे. उष्ण काळात वन्यजीवांच्या अंगाची लाही-लाही होतच असणार. मग त्यांची पावलं आपसूकच या तलावाकडे वळतात. आत्तादेखील तलावाकाठी वानरांची एक टोळी पाणी पिण्यासाठी जमली होती; पण जंगलात पाण्याच्या जागा या सगळ्यात धोकादायक असतात, हे यांना अनुभवानं माहीत असावं. दोन-तीन वानरं पाण्याला तोंड लावायची तेव्हा बाकीची चौफेर नजरा फिरवून धोक्याचा अदमास घेत होती. काठावरचे चार कांडेसर, दोन टिटव्या, तीन चक्रवाक शांतपणे बसले होते.

पद्म तलावावरून आम्ही राजबाग तलावावर गेलो. हे खरे वाघांचे ठिकाण. आजवर रणथंबोरवर अनेक देशी-विदेशी वन्यजीव प्रकाशचित्रकारांनी उत्तम फिल्म्स बनवल्या आहेत. त्यातील पन्नास टक्के फिल्म्सचं शूटिंग याच तलाव आणि त्याच्या आसपासच्या परिसरात झालेलं आहे. या तलावाच्या काठावर कंबरेएवढं उंच गवत माजलेलं होतं. त्यात लपून बसणं वाघांसाठी खूपच सोईचं होतं.

पण आता मात्र इथं गुडघाभर पाण्यात उतरून चार-पाच सांबरं निवांतपणे पाणवनस्पती खाण्यात गुंग झाली होती. त्यांचा आकार मध्य भारतात आढळणाऱ्या सांबरांपेक्षा जास्तच मोठा दिसत होता. कदाचित डोंगराळ भागात ते वावरत असल्यामुळे तसं असावं. थोड्या वेळाने परत तिथं येण्याचं ठरवून आम्ही निघालो.

मलिक तलाव हे आणखी जवळचे एक पाणस्थळ. एकाच परिसरात जवळ-जवळ तीन मोठे तलाव असणं, हीच वन्यजीव आढळण्याची मोठी संधी होती. मलिक तलावाकडे जाताना चितळांचा एक मोठा कळप रस्ता ओलांडून गेला. त्यातील पाच-सहा नरांची शिंगं तर फारच मोठी होती. पुढे एका जागी दोन नीलगाई दिसल्या. मध्येच राखी तितर, मोठा माळकुरलचेही दर्शन झाले. मलिक तलावावर जाऊनही आम्ही

रिकाम्या हातानेच परतलो. मग मी संध्याकाळचा वेळ राजबाग तलावावरच घालवायचं ठरवलं. तिथं वन्यजीव दिसण्याची शक्यता जास्त होती.

परत राजबागला परतलो तर पार पलीकडचा राजाचा 'शिकार महल' दृष्टीला पडला. आता ओस पडलेल्या या महालात बऱ्याचदा जंगलाचा राजा वास्तव्याला येतो. तसे फोटो प्रसिद्ध झाल्यामुळेच रणथंबोर वाघांचे एक वेगळे जंगल म्हणून जगप्रसिद्ध झाले आहे.

राजबाग तलावावर पोहोचून एक मोकळी जागा पाहून कँटर पार्क केला. इथून सगळा तलाव माझ्या नीट दृष्टिक्षेपात येत होता. आता पाण्यात उतरलेल्या सांबरांची संख्या वाढून दहा-बारा झाली होती. एखाद्या सांबराच्या पाठीवर बसून बगळा फुकटची सवारी करीत होता. सगळं जंगल कसं शांत, निवांत भासत होतं.

पण ही वादळापूर्वीची शांतता होती. मला तेवढ्यातच मागच्या अरण्यात फार दुरून चितळाचा 'अलार्म कॉल' ऐकू आला. मी सजग झालो आणि दुर्बीण हातात घेऊन तो परिसर बारीक नजरेने चाळू लागलो. थोडाच वेळ गेला आणि वाळक्या 'धोंक' वृक्षांच्या मागे झालेली थोडीशी हालचाल माझ्या डोळ्याने टिपली. दुर्बिणीतून पाहून ती वाघीण असल्याची माझी खात्री झाली. झाडा-झुडपांचा आडोसा घेत ती वाघीण आली आणि काठावरच्या वाळक्या गवतात शिरली.

मी श्वास रोखून तिच्याकडे पाहू लागलो. ही 'टी-१९' नाव दिलेली तरुण वाघीण होती. जगभर प्रसिद्धी पावलेल्या 'मछली'ची ही पिलू. हिच्या गळ्यात संशोधनासाठी 'रेडिओ कॉलर' लावलेला होता. 'टी-१९' ची नजर पाण्यात उतरून चरणाऱ्या सांबरांवर खिळली होती. ती सावली सरकावी तशी गवताचा आडोसा घेऊन हळूहळू पुढे सरकू लागली. आज शिकार बघायला मिळणार या जाणिवेने माझे ओठ सुकले, हृदय जोरजोरात धडधडू लागले.

शेवटी हळू हळू पुढे येत 'टी-१९' गवताच्या काठापर्यंत आली. इथून पुढे गवताचा आडोसा नव्हता. बाजूलाच माझा कँटर उभा होता. त्यानंतर तिने एक फारच अनपेक्षित गोष्ट केली. ती चक्क गवताचा आडोसा सोडून आमच्या कँटरमागे आली. मी चकित झालो. पर्यटकांच्या कँटर किंवा जिप्सीचा आडोसा घेऊन शिकार करणारी वाघीण मी माझ्या २३ वर्षांच्या व्याघ्र अभ्यासात कधीच पाहिली नव्हती.

कँटरमधून अगदी खाली आलेली वाघीण पाहून अनेकांच्या काळजाचा ठोकाच चुकला. हळूहळू पुढे सरकत ती बाहेर निघाली; पण त्याच वेळी एका सजग सांबराची तिच्यावर नजर पडली. त्याने जोराचा 'पॉक' असा इशारा दिला. पुढचा पाय पाण्यात आपटला. आता सांबरं सावध झाली आणि वाघिणीकडे पाहू लागली. वाघीण उघड्यावर

असली तरी दगडासारखी निश्चेष्ट झाली होती. अचानक पाण्याचा खळबळाट उडवत सांबरं पळू लागली. त्यांना वाट ओलांडण्यापूर्वीच धरावं, म्हणून टी-१९ ही वेगाने रस्त्याला समांतर धावली; पण सांबरांचं दैव बलवत्तर होतं. त्यांच्यातील एक सांबर तर अवघ्या तीन-चार फुटांच्या अंतराने वाघिणीच्या तावडीत सापडण्यापासून बचावला. मी या रोमांचक नाट्याने स्तिमित झालो. हीच रणथंबोरच्या जंगलाची न संपणारी जादू आहे.

**अरण्याबद्दल थोडंसं –**

एके काळी जयपूरच्या महाराजांचं खासगी शिकारीचं अरण्य असलेलं रणथंबोर १९७३ साली 'व्याघ्र प्रकल्प योजने'खाली वाघांसाठी संरक्षित करण्यात आलं. त्याआधी १९५५ साली या जंगलाला 'सवाई माधोपूर वन्यजीव अभयारण्य' असा संरक्षण दर्जा मिळालेला होता. २७४ चौ.कि.मी. क्षेत्रफळाचे जंगल १९८० साली राष्ट्रीय उद्यान घोषित करण्यात आले. १९९२ साली केलादेवी अभयारण्याचा ६७४ चौ.कि.मी., सवाई मानसिंग अभयारण्याचा १२७ चौ.कि.मी. आणि बुवालजी अभयारण्याचा ७.५८ चौ.कि.मी.चा भागदेखील या राष्ट्रीय उद्यानात जोडून याचं क्षेत्रफळ १,१७४ चौ.कि.मी. एवढं वाढवण्यात आलं.

**कशी कराल भ्रमंती –**

रणथंबोरला सकाळी आणि दुपारी अशा दोन जंगल सफारीच्या साधारणत: तीन ते साडेतीन तासांच्या वेळा ठरलेल्या आहेत. इथे पार्कमध्ये फिरण्यासाठी सामान्यत: १६ ते २० सीटचे उघडे कँटर आणि ६ माणसं बसू शकतील अशा जिप्सी उपलब्ध आहेत. जिप्सी फार महाग असल्याने कँटरची सफारीदेखील मजेशीर ठरू शकते. फोटोग्राफर असल्यास जिप्सी घेणे श्रेयस्कर. कारण कँटरमध्ये फक्त पिकनिकला आलेली लोकंदेखील येत असून त्यांचा ताप होऊ शकतो.

इथे प्रत्येक वाहनानी वनखातं आधीच एक विशिष्ट रूट नंबर देतं. केवळ त्याच रस्त्याने फिरण्याचं बंधन असतं. २, ३, ४, ५ हे रस्ते तलाव व घनदाट जंगलातून जात असल्याने वन्यजीव निरीक्षणाची जास्त संधी असते. १ व ६ या लहान वाटा असून काही वेळेस इथेही वाघ दिसतो.

**कशासाठी जाल –**

वाघ, कलंदर (caraeal), पक्षी व उत्तम पर्वत व किल्ल्यांचा मनमोहक देखावा.

**वनस्पती –**

रणथंबोरचे जंगल काटेरी, शुष्क पानगळीचे असून इथे डोंगर-दऱ्यांची कमतरता नाही. धोंक (Dhonk) हे इथले प्रमुख वृक्ष असून त्यानेच ६० टक्के जंगलाचा भाग

व्यापलेला आहे. त्याशिवाय इथे करू, धावडा, साग, बाभळी, बोर, खैर या सोबतच विविध जातींच्या निवडुंगाची देखील इथं गर्दी झाली आहे.

**वन्य प्राणी –**

रणथंबोरला जाणाऱ्या पर्यटकांचे प्रमुख आकर्षण बहुतेक वेळा वाघच असतो. इथले जंगल बरेच मोकळे व विरळ असल्याने वाघाचे अगदी दुरूनदेखील दर्शन होऊ शकते. मागील कित्येक दशकांपासून पर्यटक व त्यांच्या गाड्या पाहून इथल्या वाघांना त्यांची सवय झालेली आहे. त्यामुळे रणथंबोर हे वन्यजीव प्रकाशचित्रकारांचे नंदनवन समजले जाते. खुलं जंगल, मुबलक प्रकाश, सहजतेने दिसणारे वाघ व इतर वन्य प्राणी यांची प्रकाशचित्रकाराला भुरळ पडतेच.

वाघाशिवाय इथे बिबळ्या व कलंदर या वनमार्जारांचाही वास आहे. बिबळ्या क्वचित कड्यांवर बसलेला दिसू शकतो; मात्र माळरानातच वावरणारा दुर्मीळ कलंदर दिसणं हा कपिलाषष्ठीचाच योग समजायला हवा. इथल्या प्रमुख वन्य प्राण्यांमध्ये झिपरे अस्वल, चितळ, सांबर, चौशिंगा, चिंकारा, रानडुक्कर, साळिंदर, तरस, कोल्हा, नीलगाय, वानर, खवल्या मांजर यांचा समावेश आहे.

**पक्षीजीवन –**

इथे प्रामुख्याने टकाचोर, सर्पगरुड, करकोची चोचीचा खंड्या, शबल खंड्या, कांडेसर, लावे, तितर, पोपट, नीलपंख, वेडा राघू, राजगिधाड व इतर गिधाडं, शृंगी घुबड, पठाणी होला, सुताराचे अनेक प्रकार, हुदहुद व पाणपक्ष्यांमध्ये स्थलांतरित चक्रवाक, लालसरी, चिखले, सरगे हे बदक, जलकपोत, नीलकमल, जांभळी पाणकोंबडी हे पक्षी प्रामुख्याने दिसतात. एकूण ३०० पेक्षा जास्त पक्षी इथे आढळतात.

**सरपटणारे जीव –**

इथल्या तलावात सकाळी उन्हात पहुडलेल्या मगरी (Marsh Crocodile) नेहमीच दिसतात. त्याशिवाय घोरपड, अजगर, रानसरडा, सापसुरळी, पाणकासव, नाग, घोणस, फुरसे, पाणदिवड, धामण यांचेही वास्तव्य आहे.

**काय–कुठे बघाल –**

तीनही तलावांच्या परिसरातलं वन्यजीव व पक्ष्यांचं वास्तव्य उत्तम आहे. रूट नं. २ व ६ नं. ला वर चिंकारा बऱ्याच वेळेस दिसतो. फिरताना उंच कड्यांवर नजर असावी, कारण अनेकदा तिथं बिबळा किंवा गिधाडं बसलेली असतात.

**रणथंबोरच्या आसपास** – १) रणथंबोर किल्ल्यावरचं गणेश मंदिर व किल्ला.